# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) आगारातून जुन्या झालेल्या बसगाडयांनी प्रवासी वाहतूक होत असल्याबाबत

**(१) ४३ (०७-०४-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील राज्य परिवहन विभागाच्या आगारातील जुन्या झालेल्या गाडया तसेच वाहन चालक, वाहक व सुस्थितील वाहन कमतरतेमुळे लांब पल्ल्याच्या गाडया सुरू नसल्याने प्रवाशांचे आतोनात हाल होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल आगारातून नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूरकडे जाणा-या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने तसेच पनवेल आगारात सुस्थितीत असलेली वाहने उपलब्ध नसल्यामुळे बाहेरून येणा-या गाडयांवर प्रवाशांना अवलंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ८ वर्षापेक्षा जुनी गाडी प्रवासी वाहतूकीसाठी वापरता येत नसल्याचा मा.उच्च न्यायालयाचा आदेश असतानाही पनवेल आगारात जुन्या गाडया वापरल्या जात असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०८-०१-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

पनवेल आगारामध्ये मंजूर नियतांची संख्या ५६ आहे. त्याकरीता आवश्यक असणाऱ्या वाहनांची संख्या ६० आहे. तसेच आगारात ६२ वाहने उपलब्ध आहेत. लांब पल्ल्याच्या १० नियतांसाठी ११ वाहने उपलब्ध आहेत. आवश्यक असलेली पुरेशी व सुस्थितीमध्ये वाहने पनवेल आगारात उपलब्ध आहेत. पुणे, सातारा, कोल्हापूर या शहरांकरीता पनवेल येथून सुमारे ३६४ फेऱ्या दैनंदिन चालनात आहेत. याशिवाय धुळे, शिर्डी, सातारा, कराड, अहमदनगर या शहरांना १० बसेसद्वारे थेट बससेवा उपलब्ध करुन दिली आहे.

आगारांसाठी चालक व वाहक पदातील कमतरता दूर करण्याबाबत अतिरिक्त निवडयादी वरील उमेदवारांना मुंबई प्रदेशातील विभागांमध्ये जात प्रवर्ग निहाय रिक्त जागांवर पनवेल आगारासह सामावून घेण्याबाबतची कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाच्या दि.०३ जून, २०१९ च्या पत्रानुसार सुरु आहे.

८ वर्षापेक्षा जास्त आयुर्मान असलेल्या बसेस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत चालविण्यास मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बंदी आहे. सदर आदेश पनवेल करीता लागू नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एसटी आगार परिसर आणि बसगाडयांची स्वच्छता होत नसल्याबाबत**

**(२) ३१२ (०७-०४-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य एस .टी महामंडळाने स्थानकांत येणा-या बस गाडया स्वच्छ करुनच प्रवाशांसाठी सोडण्याकरिता खाजगी कंपनीला तीन वर्षासाठी ४५० कोटी रूपयांचे कंत्राट दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छता अभियानातंर्गत ब्रिस्क नामक कंपनीला दोन वर्षापासून कंत्राट देण्यात आले असून कंत्राटाची रक्कम ४२६ कोटी १९ लाख असून कंपनीकडून फक्त कागदोपत्री स्वच्छता होत असतानांही कंपनीचे मागील वर्षाचे १२५ कोटी रूपये इतक्या रकमेचे देयक महामंडळ प्रशासनाकडून अदा करण्यात आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदार नेमलेले असतानाही मुंबई विभागातील एसटीच्या सर्व स्थानकांत बसगाडया धुण्याच्या केंद्रांवर आधुनिक यंत्रसामग्री आणि खाजगी कंपनीचे कर्मचारी नसल्यामुळे एसटी स्थानके-आगारांचा परिसर, बसगाडया आणि कार्यालयाची स्वच्छता होत नसल्याने सर्वत्र कचरा पसरल्याचे दिनांक. ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (१७-१२-२०२०) :** (१) राज्य परिवहन बसस्थानके, कार्यालय, कर्मचाऱ्यांची विश्रांतीगृहे, प्रसाधनगृहे व बसेसच्या स्वच्छतेसाठी राज्य स्तरावर एकात्मिक सुविधा व्यवस्थापन सेवा पुरविण्यासाठी निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करुन ३ वर्षासाठी रु.४४६.९९ कोटी इतक्या रकमेवर सेवापुरवठादाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) स्वच्छतेची कामे ज्या प्रमाणात झाली आहेत. त्याप्रमाणातच देयके नियमानुसार अदा करण्यात आली आहेत. तसेच, परवाना कालावधीच्या पहिल्या २३ महिन्याच्या कालावधीसाठी सुमारे रु.१२५.०० कोटी अदा करण्यात आले आहेत.
(३) दै.सकाळ या वृत्तपत्रात दि.०७.०१.२०२० रोजी बातमी प्रसिध्द झाली आहे. सेवापुरवठादाराचे कर्मचारी उपलब्ध नसल्यास आगारातील उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून बसेस व आगाराच्या स्वच्छतेची कामे करुन घेण्यात आली आहेत.
(४) दि.०६ जानेवारी रोजी घडलेल्या घटनेबाबत करारातील नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदर रक्कम माहे जानेवारी, २०२० साठी सादर करण्यात येणाऱ्या देयकामधून रु.३६००/- वसूल करण्यात आले आहेत. तसेच, दि.०६ जानेवारी, २०२० रोजी सेवापुरवठादाराचे कर्मचारी राज्य परिवहन बसगाडया धुण्यासाठी उपलब्ध नसल्याने आगारातील उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून बसेसच्या स्वच्छतेची कामे व आगार बसस्थानकांची स्वच्छता खाजगी मजदूर लावून करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्याचे अप्पर परिवहन आयुक्त यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत**

**(३) ४२६ (०९-०४-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्याचे अप्पर परिवहन आयुक्त श्री. सतिश बी. सहस्त्रबुध्ये यांच्या गैरकारभाराची चौकशी करून कारवाई करण्याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री. शरद धुमाळ यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने राज्याचे मुख्य सचिव यांना प्रधानमंत्री कार्यालयाकडून निर्देश दिले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिवहन विभागामार्फत विविध कामाचे ठेके देताना शासनाचा मुद्रांक शुल्क बुडविला असल्याचेही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास परिवहन विभागातील अनेक कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयानुसार मत्ता व दायित्व यांचे विवरण सादर न करता अवैध संपत्ती जमा केल्याचेही निदर्शनास आले हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे व त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०६-०१-२०२१) :** (१) मा. पंतप्रधान कार्यालयाकडून श्री. धुमाळ यांचा तक्रार अर्ज आवश्यक कार्यवाहीसाठी प्राप्त झाला आहे.
(२) व (३) नाही.

(४) श्री. शरद धुमाळ यांनी मा. पंतप्रधान कार्यालयास सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने परिवहन आयुक्त. महाराष्ट्र राज्य यांच्या अहवालानुसार तत्कालीन अपर परिवहन आयुक्त हे जबाबदार नसल्याचे आढळून आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा व निलंगा तालुक्यातील शाळा खोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) १०८८ (०८-०४-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा व निलंगा तालुक्यातील अनेक शाळा निजामकालीन असून शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, नवीन वर्गखोल्यांचे व इमारतीचे बांधकाम करण्याची आवश्यकता असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीनी अनुक्रमे उपविभागीय अधिकारी कार्यालय निलंगा येथे दिनांक.१० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास झालेल्या आढावा बैठकीत, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद येथे दिनांक १० जानेवारी,२०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या आढावा बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औसा विधानसभा मतदारसंघातील किती शाळांची दुरुस्ती व नवीन इमारतीचे बांधकाम व वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्याची आवश्यकता आहे तसेच त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, सदर निधी मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०६-०१-२०२१) :**(१) होय.
(२), (३) औसा विधानसभा मतदारसंघातील २६१ शाळांतील १०७५ वर्गखोल्यांची दुरूस्ती व ४२ शाळांतील १२१ नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम करण्याची गरज आहे. वर्गखोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार त्यापैकी ७३ वर्गखोल्यांचे बांधकाम व ४५९ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी रु. ११५५.६० लक्ष निधी जिल्हा नियोजन समिती व समग्र शिक्षा अभियान या माध्यमांतून मंजूर करण्यात आला आहे. तसेच, वर्गखोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद सेस फंड व सी.एस.आर इत्यादी माध्यमांतून वर्गखोल्यांच्या बांधकाम/दुरुस्तीची तजवीज ठेवली आहे.

---

## नवरगाव (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) येथे शैक्षणिक विद्यार्थ्यांनी बससाठी आंदोलन केल्याबाबत

**(५) १०९४ (०९-०४-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवरगाव (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) येथे पेंढरी, मोटेगाव, केवाडा, वडशी, महादवाडी इत्यादी रस्त्या वरच्या गावातील शैक्षणिक विद्यार्थांना शिक्षणासाठी येणे क्रमप्राप्त असल्याने नवरगाव येथील शाळा-महाविद्यालये सुटल्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता परत जाणारी चिमूर डेपोची बस वेळेवर न सुटल्याने विद्यार्थांना ताटकळत राहावे लागल्याने विद्यार्थ्यांनी नवरगाव येथे

चक्काजाम केल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर डेपोच्या बसेस ग्रामीण भागातील सेवेसाठी योग्य वेळेवर व ठरलेल्या मार्गात चालण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार पत्रव्यवहार केला आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिमूर परिसरात नवरगाव, सिंदेवाही, ब्रम्हपुरी, नागभीड हे शैक्षणिक व व्यापारी केंद्र असतांना शासकीय बसेस योग्य वेळेवर व ठरलेल्या मार्गात चालविल्यास फायद्याचे ठरत असतांनाही वेळेत न चालविण्याने आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या चिमूर व ब्रम्हपुरी डेपोमध्ये उत्तम दर्जाच्या तसेच कमी अंतरासाठी लहान व जास्त प्रमाणात बसेस उपलब्ध होण्याकरिता प्रशासनास वारंवार पत्रव्यवहार करूनही बसेस व सुविधा उपलब्ध होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उत्तम दर्जाच्या तसेच कमी अंतरासाठी लहान व अतिरिक्त बसेस उपलब्ध होण्याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (१७-१२-२०२०) :** (१) दि.२३.१२.२०१९ रोजी राज्य परिवहन चिमूर आगारातील सिंदेवाही ते चिमूर १६.०० व १७.३० वाजता सुटणारी फेरी चालक व वाहकांअभावी रद्द झाली असल्याने, १९.०० वाजता सुटणारी सिंदेवाही ते चिमूर ही बस रत्नापूर फाटयावर विद्यार्थ्यांनी २० मिनिटे थांबवून ठेवल्याची घटना घडलेली आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) चिमूर व ब्रह्मपुरी आगारातून अनुक्रमे ५६ व ६५ नियते चालविण्यात येतात. त्याकरीता अनुक्रमे ५९ व ७० वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. सन २०१९-२० मध्ये चिमुर आगारास १० व ब्रह्मपुरी आगारास ४ नवीन बसेस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर बसेस वेळेवर व नियोजित वेळेस सोडण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**नागपूर येथे भेसळयुक्त सुपारीची विक्री होत असल्याबाबत**

**(६) ११९३ (०७-०४-२०२०). श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे भेसळयुक्त सुपारीची विक्री होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषध प्रशासन विभागाच्या कारवाईनंतर देखील सदर विक्री सुरुच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२१-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

उपरोक्त प्रकरणी अन्न औषध प्रशासनाने संबंधित आस्थापनांवर प्रभाविपणे कारवाई घेतलेली असल्याने तद्‌दनंतर संबंधित आस्थापनांविरुध्द प्रशासनास कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच संबंधित पेढीकडून उपरोक्त कारवाईनंतर भेसळयुक्त/निकृष्ट दर्जाची सुपारी विक्री होत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आले नाही.

(३) अन्न व औषध प्रशासन यांच्याद्वारे डिसेंबर, २०१९ च्या दरम्यान कृत्रिम रंग लावलेली व निकृष्ट दर्जाची सुपारी विकणाऱ्या एकुण ०४ पेढ्या व त्यांच्या ०८ गोडावून मध्ये एकूण २३ नमुने विश्लेषणास्तव घेण्यात आले असून ४,६१,०६८ किलो किंमत रु.८,५६,१४,७८०/- चा साठा जप्त करण्यात आला आहे. अन्न विश्लेषक यांनी सदरचे २३ नमुने कमी दर्जाचे असल्याचे घोषित केले असून सदर २३ प्रकरणात न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्यात आले आहेत. सदर २३ प्रकरणे न्यायनिर्णयाकरीता प्रलंबित आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्याक मंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७) १२१४ (०६-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी निर्माण केलेल्या विविध समित्या व मंडळावरील अधिकारी व कर्मचारी यांची पदे अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठीच्या योजना राबविण्यात अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरील समित्या व मंडळातील रिक्त पदांचा आढावा घेऊन उक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२८-०१-२०२१) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या अधिनस्त समित्या व मंडळांवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे प्रतिनियुक्तीने तसेच नियमित व बाहययंत्रणेमार्फत भरण्यात आलेली आहेत. तर काही पदे अतिरिक्त कार्यभाराने भरण्यात आलेली आहेत.

(२) विकासाशी संबंधित सर्व योजनांची अंमलबजावणी नियमितपणे करण्यात येत आहे.

(३) जी पदे अतिरिक्त कार्यभाराने भरण्यात आलेली आहेत त्या पदावर नियमित उमेदवार उपलब्ध करुन देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडे मागणी करण्यात आली असून त्याचा पाठपुरावाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. महामंडळातर्फे देण्यात येणारे स्मार्ट कार्ड**

**(८) १२४८ (०८-०४-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील स्वारगेट, शिवाजीनगरसह पुणे विभागातील १३ आगारामध्ये एसटी महामंडळा तर्फे ज्येष्ठ नागरिकांना स्मार्ट कार्ड काढून देण्याच्या योजनेअंतर्गत एकच खिडकी ठेवण्यात आल्याने ज्येष्ठ नागरिकांना कार्ड काढण्यास त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे स्मार्ट कार्ड मिळण्यास विलंब होत असल्याने ज्येष्ठ नागरिकांना वारंवार फे-या माराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्येष्ठांना स्मार्ट कार्ड त्वरित मिळण्याबाबत शासनाकडून कोणत्या स्वरुपाची उपाययोजना करण्यात आली अथवा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (१७-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

परंतु दि.२८.१२.२०१९ रोजी द टाईम्स ऑफ इंडिया, पुणे आवृत्ती मध्ये याबाबत बातमी प्रसिध्द झालेली आहे.

(२) व (३) ज्येष्ठ नागरिकांना स्मार्टकार्डच्या चौकशीकरीता वारंवार आगारात यावे लागू नये याकरीता संबंधितांना लघुसंदेशाद्वारे (एसएमएस) त्यांचे स्मार्टकार्ड आगारात आल्याचे कळविण्यात येते. स्मार्टकार्ड त्वरीत मिळण्यासाठी आगारांमध्ये अतिरिक्त संगणक देणे तसेच ज्या मुख्य बसस्थानकांव्यतिरिक्त ज्या वाहतुक नियंत्रण कक्षामध्ये सदर कार्यप्रणाली आवश्यक आहे तेथे मे.ट्रायमॅक्स कंपनी मार्फत पुणे विभागात १०० पेक्षा जास्त एजंटसची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली (जि. बुलढाणा) येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याबाबत**

**(९) १२८७ (२३-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाड (ता. जि. बुलडाणा) व अमडापूर (ता. चिखली जि. बुलडाणा) या परिसरात मुस्लीम समाज बहुसंख्येने असून समाजात शिक्षणाचे प्रमाण खूप कमी असल्यामुळे त्यांच्यामध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २०/१२/२०१९ रोजी सदर गावांत कौशल्य आधारित रोजगारांची निर्मिती होण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत केलेल्या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२२-१२-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) धाड (ता.जि. बुलडाणा) व अमडापूर (ता.चिखली जि. बुलडाणा) या गावात कौशल्यावर आधारित रोजगारांची निर्मिती होण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत अल्पसंख्याक विभागाने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, बुलडाणा यांना प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम अंतर्गत सविस्तर प्रस्ताव अंदाजपत्रकासह व जागा उपलब्धतेसह सादर करण्याबाबत कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव शहरात (जि. यवतमाळ) श्री लक्ष्मी सोयाबीन गोल्ड रिफाइन कंपनीच्या निकृष्ट व दुर्गंधीयुक्त तेलाची विक्री होत असल्याबाबत**

**(१०) २६६७ (०६-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव शहरातील (जि. यवतमाळ) एका नामांकित किराणा दुकातून दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी खरेदी करण्यात आलेल्या श्री लक्ष्मी सोयाबीन गोल्ड रिफाइन ऑइलच्या खाद्य तेलाच्या बंद पाकीटातील तेल दुर्गंधीयुक्त व निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार अन्न व औषधी प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधित दुकानदार व कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०५-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे. महालक्ष्मी गोल्ड रिफाईन्ड सोयाबिन तेलाबाबतची तक्रार प्रशासनास दि. २५.१२.२०१९ रोजी प्राप्त झाली.

(२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगे दि. २७/१२/२०१९ रोजी मे.अरगुलवार किराणा, महागांव, जि. यवतमाळ या पेढीची अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत रीतसर तपासणी करून रिफाईड सोयाबीन तेल (महालक्ष्मी गोल्ड) या अन्न पदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेतला. सदरचा अन्न नमुना प्रमाणित घोषित झाला आहे. सदर कार्यवाहीबाबत तक्रारदारास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या ज्वारी पिकांचे झालेले नुकसान**

**(११) ३१७७ (१४-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे सप्टेंबर- ऑक्टोबर, २०१९ मध्ये परतीच्या अवकाळी पावसामुळे ज्वारी पिकांचे नुकसान झाले असून काळी व कोंब फुटलेली ज्वारी, तालुकास्तरावरील शासकीय ज्वारी खरेदी केंद्रावर खरेदी केली जात नसल्याने तसेच कोणीही व्यापारी ही ज्वारी खरेदी करीत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, शासनाने कोणतीही जाचक अट न लावता सरसकट काळी ज्वारी खरेदी करण्याची मागणी वारंवार शासनाकडे शेतकरी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)  असल्यास, यासंदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१७-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२)  हे खरे आहे.

(३) लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार अवकाळी पावसामुळे काळी पडलेली Non-FAQ ज्वारी आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी करावी किंवा कसे, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला होता. तथापि दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये सदर विनंती केंद्र शासनाने अमान्य केली असल्याने अशा प्रकारे काळी पडलेली Non-FAQ ज्वारी राज्य शासनास आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी करता येणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील चारकोप, कांदिवली येथे प्लास्टिकची अंडी विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१२) ४२९३ (०७-०४-२०२०). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली पश्चिमेकडील चारकोप येथील काही जागृत तरुणांनी प्लास्टिकची अंडी घेऊन जाणारे दोन टेम्पो दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोन टेम्पोमध्ये सुमारे ४ हजार भेसळयुक्त प्लास्टिकची अंडी आढळून आली असून या विरुद्‌ध पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२१-०१-२०२१) :** (१) व (२) हे  खरे नाही.

(३)  मुंबई उपनगरातील चारकोप, कांदीवली येथे प्लास्टीकची अंडी असल्याच्या तक्रारीवरून दि. ०३.०१.२०२० रोजी अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी व पोलिसांनी दोन टेम्पोमधील साठा विश्लेषणासाठी ताब्यात घेतला होता. तथापि, सदर अंडी (२७२० नग) भेसळयुक्त किंवा प्लास्टिकची नसल्याचे आढळून आले आहे.

या दोन्ही अंडी विक्रेत्यांच्या आस्थापनांच्या तपासणींच्या अनुषंगाने दोन्ही अंडी विक्रेत्यांविरुध्द तडजोड अर्ज दाखल करून प्रत्येकी रु.५०००/- प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जिल्हा बीड) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बस नादुरुस्त असल्याबाबत

**(१३) ४४०७ (०९-०४-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जिल्हा बीड) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसेसची दूरवस्था झाली असून त्यातील कित्येक बसची आसने मोडकळीस आलेली असून बसेस रस्त्यातच बंद पडत असल्याने तेथील नागरिकांना व शाळकरी मुलांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची व शाळकरी मुलांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून महामंडळाचे अधिकारी प्रवाशांच्या सोयीकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१७-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

अंबाजोगाई आगारामध्ये वाहनांची नियतकालीक देखभाल करुन सुस्थितीत वाहने मार्गावर देण्यात येतात. मार्गस्थ बिघाड झाल्यास सदरचा बिघाड वेळीच हाताळला जातो. प्रवाशी व विद्यार्थी यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याची वेळीच दक्षता घेतली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(१४) ४९९० (१०-०४-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन १९९८ पासून विनावेतन काम करणा-या उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांना वित्तीय तरतूद करुन त्यांना दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून २० टक्के वेतन दिले जाईल असा शासन निर्णय देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासन निर्णयामध्ये या शिक्षकांना वेतन देताना १०० टक्के निकालाची अट घातलेली असून ही अन्यायकारक अट रद्द करण्यात यावी अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णयामध्ये बदल करुन गत १८ वर्ष वेतनापासून वंचित असलेल्या शिक्षकांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१६-१२-२०२०) :** (१) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४ (३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे. तथापि, मंत्रीमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० च्या बैठकीत दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) शासन निर्णय, दिनांक २९ जानेवारी, २०२० मधील तरतूदीनुसार मूल्यांकनाचे शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ व दिनांक ४ जून, २०१४ मधील अटी व शर्तीनुसार अनुदान देण्यात येणार आहे. यात १०० टक्के निकालाची अट बंधनकारक नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे वेतन देणाच्या शासनाच्या निर्णयाबाबत**

**(१५) ५८९० (१०-०४-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे शिक्षकांचे वेतन ठरविण्याबाबत शासनाने दिनांक ४ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास परिपत्रक काढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याचा सर्वाधिक भुर्दंड मराठी शाळांना बसणार असून सदर निर्णयाविरुध्द शिक्षण संघटनांकडून तिव्र विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर निर्णयाचा फेर विचार करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (३०-१२-२०२०) :** (१) व (२) आयुक्त (शिक्षण) यांनी दिनांक ४ डिसेंबर, २०१९ अन्वये शालेय शिक्षण विभागाशी संबंधित महत्वाच्या विषयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विषयावार अभ्यासगट स्थापन करण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित केले होते.
(३) मात्र सदर अभ्यासगट आयुक्त (शिक्षण) यांच्या दिनांक १९ डिसेंबर, २०१९ च्या पत्रान्वये रद्द करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात भेसळयुक्त चहा विक्रेते व उत्पादकांवर कारवाई करण्याबाबत**

**(१६) ६०६५ (०७-०४-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्त्यावरील चहा टपरी व हॉटेल येथे टाकलेल्या छाप्यांमध्ये भेसळ युक्त, रंग टाकलेल्या चहा पावडरचा वापर करुन तयार केलेला चहा ग्राहकांना देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येवले अमृततुल्य या १८५ पेक्षा अधिक फ्रॅचाइजीं असलेल्या चहा मसाल्याची अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे विभागाने माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान

तपासणी करुन एक लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे पदार्थ जप्त करुन ते राज्य आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते परंतु याबाबत राज्य आरोग्य प्रयोगशाळेने पाठविलेला अहवाल समाधानकारक नसल्याने म्हैसूर येथील प्रयोगशाळेत पाठविले असता मसाल्यामध्ये खाण्यास अन्न सुरक्षा मानके कायद्यान्वये बंदी असलेल्या टाट्राझिन या कृत्रिम खाद्यरंगाचे मिश्रण असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यामध्ये दिनांक १ जानेवारी, २०१८ पासून आजतागायत किती चहा पेय विक्रेते व चहा पावडर उत्पादक यांच्यावर छापे टाकले आहेत, त्यापैकी प्रयोगशाळेमध्ये चाचणी केलेल्या किती नमुन्यामध्ये रंग व इतर भेसळ आढळून आली,

(४) असल्यास त्यानुसार दिनांक १ जानेवारी, २०१० पासून अन्न व औषध प्रशासन विभागाने दाखल केलेल्या गुन्हयांमधून किती चहा पेये विक्रेते व चहा पावडर उत्पादक यांच्यावरील गुन्हे न्यायालयामध्ये सिद्ध झाले आहेत,

(५) तसेच चहा पावडर उत्पादक, विक्रेते, रस्त्यावरील चहा टपरी व हॉटेलमधील चहा पेय विक्रेते यांचेकडील चहा मधील रंग व इतर भेसळ शोधून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यासाठी व भेसळ रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२१-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात काही ठिकाणी चहा तयार करताना वापरण्यात येणाऱ्या चहा मसाला व चहा पावडर मध्ये सिंथेटीक फुड कलर टारट्राझिन हा खाद्यरंग वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

दि. २१/०९/२०१९ रोजी मे.येवले फुड प्रोडक्ट्स, पुणे या अन्न उत्पादक आस्थापनेची तपासणी करून घेण्यात आलेल्या चहा मसाला(सुटा) व (पॅक) या अन्न पदार्थाचे नमुने राज्य आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते याबाबत राज्य आरोग्य प्रयोगशाळेने पाठविलेला अहवाल समाधानकारक नसल्याने सदरचे नमुने रेफरल फुड लॅबोरेटरी, म्हैसुर येथे तपासणीसाठी पाठविले, सदर नमुन्यात टारट्राझिन हा सिंथेटीक कलरींग मॅटर असल्याचे रेफरल फुड लॅबोरेटरी, म्हैसूर यांनी त्यांच्या अनुक्रमे दि.१४.०१.२०२० व दि.२०.०१.२०२० च्या अहवालात नमुद केले आहे.

(३) राज्यात दि. ०१ जानेवारी, २०१८ ते आजतागायत विविध ठिकाणी चहा पेय विक्रेते, चहा पावडर विक्रेते व चहा पावडर उत्पादक यांच्यावर छापे टाकून एकूण १३७ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. त्यापैकी ५१ नमुने प्रमाणित दर्जाचे घोषित झाले. तसेच कृत्रिम खाद्यरंग टारट्राझिन हा आढळून आल्यामुळे ०२ नमुने असुरक्षित घोषित झाले असून १४ नमुने मानदाप्रमाणे नसल्याचे आढळून आले आहे. १३ नमुने लेबलदोषयुक्त आढळून आले. ५७ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

(४) राज्यात चहा पेये विक्रेते व चहा पावडर उत्पादक यांचेविरुध्द ०५ गुन्हे दाखल झालेले आहेत व ते मा. न्यायालयात न्यायप्रविष्ट असून प्रलंबित आहेत.

(५) अशा प्रकरणी वारंवार मोहिमा घेवून, धाडी जप्ती टाकून चहा पावडर उत्पादक, विक्रेते, रस्त्यावरील चहा टपरी व हॉटेल मधील चहा पेय विक्रेते यांची नियमित तपासणी करून अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्याबाबत अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहे. त्या अनुषंगे नमुने घेण्यात येतात व प्राप्त विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत कारवाई घेण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुक्त रिक्षा परवान्याचे धोरण अवलंबताना गरजू व बेरोजगारांना तसेच स्थानिकांना डावलले जात असल्याबाबत.**

**(१७) ६०८७ (१०-०४-२०२०). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गत काही वर्षापासून मुक्त रिक्षा परवान्याचे धोरण अवलंबले असून परवाने खुले करतांना गरजू व बेरोजगारांना तसेच स्थानिकांना प्राधान्य मिळावे यासाठी १५ वर्षे वास्तव्याची अट घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परराज्यातून आलेल्या असंख्य परप्रांतीयांनी राज्यात एक ते दोन वर्ष राहिले असतानाही दलालांच्या सहकार्याने बनावट कागदपत्रांद्वारे शाळेचे दाखले, रेशन कार्ड सादर करून स्थानिक वास्तव्याचे दाखले मिळविले असल्याने याबाबतच्या चौकशीची मागणी कोकण विभाग रिक्षा-टॅक्सी महासंघाने केली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**ॲड. अनिल परब (१४-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४ (२) मधील तरतूदीनुसार लोकसेवा वाहन चालविण्याचे अधिकारपत्र मिळण्यासाठी अर्जदारास अर्जासोबत सक्षम प्राधिकरणाकडून नमुना "एस.ई.सी." मध्ये प्राप्त केलेले १५ वर्षे वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

(२) हे खरे आहे.

कोकण विभाग रिक्षा-टॅक्सी महासंघ, कल्याण जि.ठाणे यांचे दि.०१.०१.२०१८ रोजीचे निवेदन प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

(३) अर्जदाराने ऑटोरिक्षा व टॅक्सी परवाना प्राप्त करताना सादर केलेले अधिवास/स्थानिकत्व प्रमाणपत्र व वर्तणूकीचा दाखला याची खातरजमा करण्यास व बनावट कागदपत्रांआधारे ऑटोरिक्षा व टॅक्सी परवाने जारी झाल्याचे आढळल्यास, संबंधितांविरूध्द गुन्हे दाखल करून तात्काळ परवाने रद्द करण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.०१.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निर्देश दिलेले आहेत.

नमूना "एस.ई.सी." नुसार वास्तव्याचे प्रमाणपत्र हे महसूल विभागाव्दारे व रेशनकार्ड हे शिधावाटप कार्यालयाकडून जारी करण्यात येतात.

तसेच वसई पोलीस स्टेशनमध्ये ९ अर्जदारांनी खोटे रहिवासी व अधिवास प्रमाणपत्र दाखल केल्याबाबत त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यासंदर्भात तहसिलदार कार्यालय, वसई यांच्या दि.०४.०४.२०१९ च्या पत्राच्या अनुषंगाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई येथे ९ अर्जदारांपैकी ५ अर्जदारांनी अनुज्ञप्ती व बॅज तसेच परवान्यासाठी इरादापत्र प्राप्त केले असल्याचे निदर्शनास आल्यावरून सदर ५ अर्जदारांची अनुज्ञप्ती व बॅज तसेच २ जणांनी केलेली वाहनाची नोंदणी रद्द करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई कचरामुक्त करण्यासाठी अभियान सुरु करण्याच्या निर्णयाबाबत**

**(१८) ६३३४ (०७-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कचरामुक्त करण्यासाठी अभियान सुरु करण्याचा निर्णय मा.पर्यावरण मंत्री यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२७-०१-२०२१) :** (१) व (२) शासनाकडून वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले असून, मुंबई कचरा मुक्त करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत:

i) मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित येत असणाऱ्या सर्व रस्त्यांची घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत सकाळपाळी मध्ये सफाई करण्यात येते. आवश्यकतेनुसार अधिक कचरा असलेल्या/विशेष रस्त्यांची सफाई तीन पाळयांमध्ये करण्यात येते.

ii) घरा-घरातून कचरा संकलन करण्यात येत असून, झोपडपट्टी वस्त्यांमधून कचरा संकलन करण्याकरीता स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान (SMPA) योजना राबविण्यात येत आहे.

iii) मोठया प्रमाणात कचरा निर्माण होणाऱ्या ठिकाणी संकलनाकरिता डबे ठेवण्यात आले असून, सदर डब्यांमधील कचरा तीन पाळयांमध्ये नियमित उचलण्यात येतो.

iv) रहदारीची ठिकाणे, बस थांबे, पर्यटनस्थळे, इत्यादी ठिकाणी ओल्या व सुक्या कचऱ्याकरीता स्वतंत्र कचरापेटया बसविण्यात आल्या आहेत. सदर कचरापेटयांमधला कचरा रस्ते सफाई करताना उचलला जातो.

v) उपरोक्त कचरा संकलन आणि वाहतुकीकरीता विभाग स्तरावर गाडयांच्या मार्गाचे नियोजन करण्यात आले असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात आहे.

vi) महानगरपालिकेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या क्लीन अप मार्शल्सद्वारे कचरा करणाऱ्यांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

vii) विभागीय स्तरावर स्वच्छता, कचरा वर्गीकरण, कचऱ्याची विल्हेवाट, इत्यादींकरीता नियमितपणे जनजागृती करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसेसवर व बसस्थानकामध्ये करण्यात आलेल्या जाहिरातीबाबत.**

**(१९) १०९४१ (०६-०६-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसवर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी मे. राकेश ॲडव्हरटाईजिंग प्रा. लि. यांची आणि बसस्थानकांवर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी मे. श्री.ओम ॲडव्हरटायजिंग यांची निविदाप्रक्रियेव्दारे निवड करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भातील प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सुरक्षा व दक्षता अधिकारी, राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेमार्फत चौकशी केली असता या संस्थांनी बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याचे निष्पन्न झाले असून संबधित संस्थांकडून थकीत रक्कमेची वसुली करणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१७-१२-२०२०) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसवर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी मे. राकेश ॲडव्हरटाईजिंग प्रा. लि. यांची आणि बसस्थानकांवर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी मे. श्री. ओम ॲडव्हरटायजिंग यांची निविदा प्रक्रिया राबवून निवड करण्यात आलेली आहे. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाने विविध जाहिराती प्रसिध्द करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करुन त्याअन्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने जानेवारी २०१९ मध्ये कार्यादेश दिलेले होते. यासंदर्भातील प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प. महामंडळ यांचेमार्फत चौकशी केली असता, या संस्थांनी बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार या संस्थांवर पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या आदेशानंतर शैक्षणिक शुल्क वसुली व शुल्कवाढ करणाऱ्या शैक्षणिक संस्थांवर कारवाई करण्याबाबत**

**(२०) ११३६१ (२८-०७-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.गणेश नाईक (ऐरोली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह**

**(घाटकोपर पूर्व), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाचा प्रभाव रोखण्यासाठी संपूर्ण भारतामध्ये लॉक डाऊन सुरू असून त्याचा परिणाम सर्वसामान्य जनतेला सोसावा लागत असल्याने या शैक्षणिक वर्षात अकरावी प्रवेशाचे वेळी शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांनी गत वर्षापेक्षा अधिक शुल्क आकारू नये अशी मागणी सिस्कॉम या संघटनेने मा. मंत्री शालेय शिक्षण विभाग यांना माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून पालकांकडे संपूर्ण वर्षाचे शुल्क एकरकमी भरण्यासाठीचा तगादा न लावता त्यांना सोयीनुसार शुल्क भरण्याची मुभा मिळावी तसेच चालू शैक्षणिक वर्षात फी मध्ये कोणतीही वाढ न करता शासनाच्या अटी शर्थीनुसार विविध सवलती देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा. शालेय शिक्षण मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वार्षिक शैक्षणिक शुल्क वसुली एकदाच न घेता मासिक त्रैमासिक जमा करण्याचा पर्याय पालकांना देण्याबाबत तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी शुल्कवाढ न करण्याबाबत शासनाने दिनांक ८ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व बोर्डाच्या, सर्व माध्यमांच्या शाळांना आदेश दिले असूनही सदर आदेशांचे पालन न करता अनेक शाळांकडून शुल्क वसुली व फी वाढ करण्यात येत असल्याचे तसेच ऑनलाईन शिक्षण सुरु असतानाही विद्यार्थ्यांकडून ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडासंकुले यांचे शुल्क आकारत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये निदर्शनास आले असून वापरात नसलेल्या सुविधांचे शुल्क भरण्यास पालकांनी विरोध दर्शविला आहे, हे ही, खरे आहे काय,

(४) असल्यास, या शुल्कवाढी विरुध्द ज्यांच्याकडे दाद मागायची त्या महाराष्ट्र शुल्क विनियमन अधिनियम, २०११ च्या तरतुदीनुसार विभागीय नियामक शुल्क समित्या व पुनरिक्षण समिती गठीत करण्याची शासन स्तरावर सुरू असलेली कार्यवाही अद्यापही पूर्ण झाली नसून सदर समित्या अद्याप गठित करण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, एकत्रित वार्षिक शुल्क आकारण्याऐवजी ते टप्प्या-टप्प्याने आकारण्याबाबत राज्य शासनाने दिनांक. २१ मे, २०२० रोजी काढलेल्या आदेशाला दिनांक २६ जून, २०२० रोजी मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असून आपत्कालीन व्यवस्थापन कायदा व शाळा कायद्याअंतर्गत शुल्काबाबत शाळांना आदेश देण्याचे अधिकार शासनास असतानाही शासनाने तसे अधिकाराचा वापर करुन आदेश काढणे व मा.न्यायालयात सक्षमपणे बाजु न मांडण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, शासनाने गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या वाढीव शैक्षणिक शुल्काबाबत तसेच पूर्व प्राथमिक ते इयत्ता बारावी पर्यंत शुल्क भरता आले नसलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेतून काढल्यास संबंधित शाळेवर कोणती कारवाई करण्यात येत आहे वा येणार आहे, तसेच विभागीय नियामक शुल्क समित्या व पुनरिक्षण समिती गठित करण्यासाठी आणखी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-१२-२०२०) :** (१) या संदर्भातील निवेदन मा. मंत्री (शालेय शिक्षण) कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) या संदर्भात पालक संघटनांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(३) होय

(४) (५) व (६) शासन अधिसूचना दि. २० फेब्रुवारी, २०२० अन्वये पूनरिक्षण समितीचे पूर्नगठण करण्यात आले असून पुनरीक्षण समितीमधील अशासकीय सदस्य नियुक्ती व विभागीय शुल्क नियामक समित्या गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासनाच्या दि. ८ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयास मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२६ जून २०२० रोजीच्या आदेशान्वये अंतरिम स्थगिती दिली आहे. सदर आदेशाविरूध्द शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**कोरोना महामारीमुळे राज्यातील वाहतुक सेवा बंद असल्याने ट्रक व टेम्पो यांच्या कर आणि विम्यामध्ये सवलत मिळणेबाबत**

**(२१) ११४०३ (१६-०९-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना या महामारीमुळे राज्यातील वाहतुक सेवा बंद असल्याने ट्रक व टेम्पो यांच्या टॅक्स आणि विम्यामध्ये सवलत मिळणेबाबत मा. परिवहन मंत्री यांना दिनांक ४ एप्रिल, २०२० रोजी लोकप्रतिनिधिंनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (०८-०१-२०२१) :** (१) व (२)

या संदर्भात शासनाने दि.१५/९/२०२० व दि.३०/९/२०२० च्या अधिसूचनेद्वारे "राज्यामध्ये वार्षिक कर भरणाऱ्या वाहनांना दि.१/४/२०२० ते दि.३०/९/२०२० या सहा महिन्यांच्या कालावधीत कर भरण्यापासून १००% करमाफी म्हणजे सन २०२०-२१ या वर्षासाठी एकूण वार्षिक कराच्या ५०% करमाफी देण्याचा निर्णय घेतलेला आहे."

(३) प्रश्न उद्भभवत नाही.

---

**नाशिक शहरात कामटवाडे येथे बनावट सॅनिटायझर तयार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२२) ११४३५ (१४-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात कामटवाडे येथे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनधिकृतपणे निकृष्ट दर्जाचे सॅनिटायझर तयार करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साधारणत: किती कालावधी पासून अशा निकृष्ट दर्जाच्या सॅनिटायझरचे उत्पादन घेतले जात होते व किती प्रमाणात त्याची विक्री करण्यात आली याबाबत सखोल तपास करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उक्त तपासानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२१-०१-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
विनापरवाना सॅनिटायझर उत्पादन करून विक्री होत असल्याचे आढळून आले आहे.
(२) होय, तपास करण्यात आला आहे.
(३) आशिर्वाद प्राईड अपार्टमेंट,कामटवाडा,नाशिक येथे विनापरवाना हॅण्डसॅनिटायझर व हॅण्डवॉशचे उत्पादन होत असल्यामुळे अन्न व औषध प्रशासन,नाशिक यांनी रू. ६,१४,२०७/- चा साठा जप्त केला आहे. सदर प्रकरणी घेण्यात आलेल्या नमुन्यांच्या चाचणी व विश्लेषणाचा अहवाल औषध नियंत्रण प्रयोगशाळा, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झाला असून हॅण्ड सॅनिटायझर उत्पादन प्रमाणित असल्याचे घोषित करण्यात आले आहे. विनापरवाना उत्पादीत प्रकरणी तपास पूर्ण करून संबंधितांवर औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत खटला दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खेड (जि.पुणे) तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२३) ११४५९ (१५-०९-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील लॉक डाऊनच्या काळात कामगार व नागरिकांची उपासमार होऊ नये यासाठी शासनाकडून माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान अन्नधान्य वितरण योजना राबविण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यात काही दुकानदारांनी या रेशनिंगच्या धान्याचा काळाबाजार करून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुक्यातील काही गावांमध्ये बोगस रेशनिंग कार्ड तयार करुन लाभधारकांना प्रत्यक्ष धान्य वाटप न करता वितरित केल्याचे दाखविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी धान्य दुकानदार व इतर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (११-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) बोगस रेशनिंग कार्ड तयार करुन लाभार्थ्यांना धान्य वाटप केले अशी बाब निदर्शनास आली नाही परंतु स्वस्त धान्य दुकानदार यांनी कमी धान्य वाटप करणे, धान्याची पावती न देणे अशा तक्रारी प्राप्त झाल्याने तहसीलदार यांच्यामार्फत तपासणी करण्यात येऊन प्राप्त दोषांच्या अनुषंगाने कारवाई करण्यात आली आहे.

तपासणीमध्ये धान्याची तफावत आढळून आलेल्या स्वस्त धान्य दुकान परवानाधारकांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

५ स्वस्त धान्य दुकान परवाने निलंबित, १ स्वस्त धान्य दुकान परवाना रद्द तसेच १ स्वस्त धान्य दुकान धारकास सक्त ताकीद व १ रास्त भाव दुकानदाराची अनामत रक्कम जप्त केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यासह अहमदनगर जिल्ह्यातील विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांची उपासमार होत असल्याबाबत**

**(२४) ११८४२ (१३-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पंकज भोयर (वर्धा), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील विनाअनुदानित शाळांमध्ये ६०० पेक्षा अधिक शिक्षक काम करीत असून अनेक मोर्चे, आंदोलनानंतर शासनाने दहा वर्षापूर्वी कायम विनाअनुदानित मधील कायम हा शब्द काढला परंतू अद्याप अनुदान दिलेले नसावे त्यामुळे लॉकडाऊनमुळे या शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील अनेक विनाअनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांचे अनुदानासह इतर अनेक समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दिनांक १ एप्रिल २०१९ पासून विनाअनुदानित शाळांना तसेच घोषित शाळांना २०% व त्यापूर्वीच्या शाळांना अतिरिक्त २०% अनुदान देण्याचा निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी घेऊन व अर्थसंकल्पात तशी निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लॉकडाऊनमुळे राज्याची आर्थिक स्थिती खालावली असणे, संस्थाचालकांनी मानधन देणे बंद केल्यामुळे तसेच शिक्षक माहे मार्च, २०२० पासून घरी असून व शाळा कधी सुरु होतील, याची शाश्वती नसल्यामुळे विना अनुदानित शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार विनाअनुदानित शिक्षकांचे वेतन तसेच अनुदान देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (१६-१२-२०२०) :** (१) व (२) शासनाने "कायम" शब्द काढला हे खरे आहे. तथापि, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४ (३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे.

(३) व (४) मार्च २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/तुकडयांना वेतन अनुदान मंजूर करण्यासाठी लाक्षणिक पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात येऊन प्रत्येकी रु.१००० ची लाक्षणिक पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली होती. तथापि लोकप्रतिनिधी व शिक्षक संघटनांनी मागणी केल्यानुसार शासन निर्णय, १३ सप्टेंबर, २०१९ मधील काही अटी व शर्ती शिथील करण्यावरील प्रस्तावाबाबत मंत्रीमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या बैठकीत पात्र शाळांना दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तारकपूर (अहदमनगर) आगारातील प्रादेशिक अभियंता यांनी डिझेलची केलेली अफरातफर

**(२५) ११९५५ (१६-०९-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.राजेश पाडवी (शहादा), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर विभागातील नियंत्रण समिती क्रमांक ३ वर कार्यरत असलेले प्रादेशिक अभियंता श्री. सुनील भगवान कोल्हे यांनी राज्य परिवहन विभाग, अहमदनगर येथे यंत्र अभियंता (चालन) पदी कार्यरत असताना तारकपूर आगारात दिनांक ०१/०१/२०१९ ते दिनांक ३१/०३/२०२० या कालावधीत संबंधित आगाराचा सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, व आगार व्यवस्थापक यांच्याशी संगनमत करून पाच हजार लिटर डिझेलची अफरातफर केल्याचे निदर्शनास आले आहे हे खर आहे का,

(२) असल्यास यामुळे राज्य परिवहन महामंडळाचे सुमारे चार लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार डिझेलची अफरातफर करून राज्य परिवहन महामंडळाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०८-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी सुरक्षा व दक्षता अधिकारी, राज्य परिवहन अहमदनगर यांच्या अहवालावर विभाग नियंत्रक, राज्य परिवहन अहमदनगर यांचेकडून यंत्र अभियंता (चालन), सुरक्षा व दक्षता अधिकारी व विभागीय भांडार अधिकारी यांना संयुक्तरित्या तपासणी करुन जबाबदारी निश्चित करुन अहवाल सादर करण्याबाबत पत्र देण्यात आले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने विभागीय भांडार अधिकारी व यंत्र अभियंता (चालन) यांनी संयुक्तरित्या चौकशी करुन

दि.३१.१२.२०१९ राजी अहवाल सादर केला असून, सदर अहवालात दि.०८.०३.२०१९ रोजी ४६४२.७१ लिटर, दि.२९.०४.२०१९ रोजी २३६९.२३ लिटर डिझेल शॉर्टेज दर्शविण्यात आले. सतत शार्टेज वाढत असल्याने पंपाची तपासणी करणेबाबत वेळोवेळी बी.पी.सी.एल. यांचे प्रतिनिधी व वरिष्ठांकडे पाठपुरावा करण्यात आला. त्यानुषंगाने बी.पी.सी.एल. यांचेकडून दि.०९.०८.२०१९ ते १९.०८.२०१९ या कालावधीत पंपाची पाईपलाईन खोदून तपासणी केली असता, इनलेट पाईपला ८ एमएम आकाराचे छिद्र आढळून आले. पाईपच्या बाजूची सर्व माती तेल मिश्रीत आढळून आली. दि.१५.१०.२०१९ रोजी मे. बी.पी.सी.एल. यांना ई-मेल द्वारे पाईपचे फोटो व पंचनामा जोडून सन २०१९-२० सी.एस.व्ही.चे २२६३.७९ व त्यानंतर १९.०८.२०१९ पर्यंतचे १२९४.३७ असे एकूण ३५५८.०६ लिटर डिझेलची रक्कम रु.२,२६,०७९.१३ वसुलीबाबत पाठपुरावा सुरु आहे.

इंधन लिपीकांनी डिप रजिस्टर नुसार योग्य नोंदी न नोंदवता चुकीच्या नोंदी नोंदवून पुस्तकीसाठा व प्रत्यक्षसाठा यांचे प्रमाण लपविले, परंतु चोरी/आर्थिक अपहार झालेला नाही. या बाबीस बी.पी.सी.एल. पुर्णत: जबाबदार असले तरी इंधन लिपीक, सहायक कार्यशाळा अधीक्षक व आगार व्यवस्थापक हे अंशत: जबाबदार असल्याचा अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालावर आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन तारकापूर यांनी इंधन लिपीक यांना आरोपपत्र दिले असून, सहायक कार्यशाळा अधीक्षक यांचा अहवाल प्रमादीय कार्यवाहीस्तव उप महाव्यवस्थापक, नियंत्रण समिती क्र.२ यांचकडे विभाग नियंत्रक यांनी पाठविलेला आहे. तसेच तत्कालीन आगार व्यवस्थापक हे दि.३१.०५.२०१९ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रेशनकार्ड असलेल्या व नसलेल्या अंत्योदय, प्राधान्य गट व शेतकरी अशा सर्व नागरीकांना सवलतीच्या दरात व मोफत धान्याचा लाभ देण्याबाबत**

**(२६) ११९७६ (१५-०८-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः हिंगोली जिल्हयात अनेक कुटुंबाना शिधापत्रिका वाटप झाले नसल्याची बाब कोविड-१९ साथीच्या काळात माहे एप्रिल, २०२० च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोरोना महामारीच्या लॉकडाऊनमध्ये अंत्योदय, प्राधान्य गट व शेतकरी यांना सवलतीच्या दरात प्रति व्यक्ती ५ किलो तर मे, जून व जुलै या महिन्यात प्रति व्यक्ती ५ किलो गहू व तांदूळ मोफत देण्याची घोषणा करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत राज्यातील गरीब मजूरांच्या कुटूंबियांना मोफत अन्नधान्य आणखी पाच महिने ऊपलब्ध करून देण्याबाबत केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) असल्यास, ज्यांच्याकडे रेशनकार्ड नाही, जी कुटुंबे विभक्त झाली त्यांचे कार्ड ऑनलाईन नाही त्यांना सवलतीच्या दरात आणि मोफत धान्याचा लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रेशनकार्ड असलेल्या व नसलेल्या अंत्योदय, प्राधान्य गट व शेतकरी अशा सर्व नागरीकांना सवलतीच्या दरात व मोफत धान्याचा लाभ देण्याची मागणी बुलढाणा येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ एप्रिल २०२० रोजी जिल्हा आढावा बैठकीदरम्यान मा. गृहमंत्री तसेच मा.मुख्यमंत्री सचिवालयाचे अवर सचिव यांच्याकडे दि. २३ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (०७-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत माहे एप्रिल, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य व प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलो डाळ मोफत वितरणासाठी उपलब्ध करुन दिली आहे.
केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या नियतनाच्या अनुषंगाने प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत माहे एप्रिल, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीकरिता जिल्हानिहाय अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे आहे.
(६) केंद्र शासनाने आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत राज्यातील विनाशिधापत्रिकाधारक स्थलांतरित मजूर इत्यादींना माहे मे व जून, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो तांदुळ व प्रतिकुटुंब १ किलो अख्खा चणा मोफत उपलब्ध करुन दिला आहे. त्यानुसार आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत माहे मे व जून, २०२० करिता जिल्हानिहाय नियतन उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या तसेच शेतकरी योजनेत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना माहे मे ते ऑगस्ट, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य ₹१२/- प्रतिकिलो तांदुळ व ₹ ८/- प्रतिकिलो गहू या सवलतीतील दरात उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हा परिषदच्यावतीने घेण्यात आलेल्या सराव परीक्षेच्या इंग्रजी व बुद्धिमत्ता चाचणीच्या प्रश्नपत्रिकेसोबत विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका मिळाल्याबाबत.

**(२७) १२००४ (१३-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदच्यावतीने इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांच्या घेण्यात आलेल्या सराव परीक्षेत इंग्रजी व बुद्धिमत्ता चाचणीच्या

प्रश्नपत्रिकेसोबत उत्तराची सूची छापण्यात आली असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (११-१२-२०२०) :** (१) होय.

(२) छपाईदाराने चुकीने सराव चाचणीमध्ये प्रश्नपत्रिकेसोबत उत्तरपत्रिका छापल्याचे आढळून आले होते. तद्नंतर सदर परीक्षा रद्द करण्यात येऊन नवीन प्रश्नपत्रिका छापण्यात आल्या व नंतर सराव परीक्षा घेण्यात आल्या. यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून सविस्तर चौकशी करण्यात आली. त्याअनुषंगाने छपाईदार व संबंधित गट शिक्षणधिकारी यांना शिक्षणधिकारी कार्यालयाकडून नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरात स्वस्त धान्याचा दुकानदाराकडून अपहार होत असल्याबाबत

**(२८) १२०७० (१४-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात शहर अन्नधान्य पुरवठा विभागाकडून नऊ स्वस्त धान्य दुकानांवर माहे फेब्रुवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारवाई दरम्यान स्वस्त धान्य दुकानांमध्ये अस्वच्छता, विहित कालावधीत व वेळेच्या आधीच दुकान बंद करणे, दुकानातून विक्री झालेले आणि प्रत्यक्षात उपलब्ध धान्य यात तफावत असणे, पुणे शहर व येरवडा येथे तूरडाळ,हरबरा व गहू इत्यादी निकृष्ट दर्जाच्या धान्याचे वाटप होत असणे, उंदरांचा वाढता उपद्रव, दुकानाच्या भिंती ओल्या असणे तसेच अधिकारी व व दुकानदार संगनमत करून शासनाकडून मिळालेल्या धान्याची परस्पर विक्री करीत असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चोकशीत काय आढळून आले व त्यानुसार ज्या लाभार्थ्यांचे ई-पॉस मशीनवर अंगठे उमटत नाहीत त्यांना वेगळे कार्ड देणे, स्वस्त धान्य दुकानाबाहेर दुकानाची वेळ नमुद करणे, धान्याच्या किंमतीचा फलक दुकानाबाहेर लावणे तसेच लाभार्थ्यांना पूर्ण युनिट प्रमाणे जबाबदारीने धान्य वितरित करणे आणि निकृष्ट धान्य वाटप करुन धान्याचा गैरव्यवहार करणाऱ्यांची चौकशी करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (११-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही, तथापि, अस्वच्छता, विहित वेळेच्या आधीच दुकान बंद करणे तसेच दुकानातून विहित विक्री झालेले आणि प्रत्यक्षात उपलब्ध धान्य यात तफावत असणे अशा तक्रारी प्राप्त झाल्याने नियमित तपासण्या माहे जानेवारी, २०२० ते जुलै,२०२० या कालावधी दरम्यान करण्यात आल्या होत्या.
(३) ज्या लाभार्थ्यांचे पॉस मशीनवर अंगठे उमटत नाहीत त्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे आधारकार्ड ऑनलाईन अपडेट करण्यात आले असून त्यांना धान्य वाटप करण्यात आले आहे.

अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्या कार्यालयाकडून माहे जानेवारी, २०२० ते माहे जुलै,२०२० या कालावधीत एकूण ५७ रास्तभाव दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी अनुक्रमे २१ रास्तभाव दुकानांची अनामत रक्कम जप्त, ६ दुकाने कायमस्वरुपी रद्द, १६ प्रकरणी अनामत रक्कम जप्त करुन धान्य तफावतीची नुकसान भरपाई रक्कम वसुली, ३ प्रकरणी ताकीद, ४ दुकाने निलंबित व उर्वरित ७ प्रकरणांमध्ये सुनावण्या प्रलंबित आहेत. तसेच, येरवडा येथील परिमंडळ ई विभागात १ परवाना निलंबित, ३ परवाने अनामत जप्त, १ प्रकरणी अनामत जप्त करुन धान्य तफावत दंड, १ परवाना कायमस्वरुपी रद्द करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) येथील बस स्थानकाच्या नुतनीकरणाच्या कामाबाबत**

**(२९) १२३६६ (१६-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथील बस स्थानकाचे नुतनीकरणाच्या कामास शासनाची मंजूरी मिळालेली असताना सदर काम अद्याप सुरू करण्यात आले नसल्याचे माहे मे-जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बस स्थानकाच्या नुतनीकरणाच्या कामास कार्यारंभ करण्याचे आदेश शासनाकडून केव्हा देण्यात आले होते व सदरहू काम कोणामार्फत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर, किती कालावधीत व कोणती कारवाई करणार आहे तसेच या बस स्थानकाच्या नुतनीकरणाचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०७-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
शहापूर (जि.ठाणे) येथील बसस्थानकाचे काम सुरु करण्यात आलेले आहे. तथापि, माहे मे-जून, २०२० मध्ये कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे कामाची गती मंदावलेली आहे.
(२) व (३) शहापूर (जि.ठाणे) येथील बसस्थानकाच्या बांधकामास कार्यकारी अभियंता, राज्य परिवहन मुंबई प्रदेश (कुर्ला) यांचे दि.१३.०६.२०१८ च्या पत्रान्वये कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदरहू काम मे.कार्डा कंस्ट्रक्शन लि.भांडूप, मुंबई यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर काम सुरु असून कामाची मुदत ३० महिन्यांची म्हणजे दि.१२.१२.२०२० पर्यंत आहे. सदर काम मुदतीमध्ये पूर्ण करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळ प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राहेर (ता.नायगांव, जि.नांदेड) येथील नृसिंह मंदिराच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत**

**(३०) १२६३२ (१६-०९-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहेर (ता.नायगांव, जि.नांदेड) येथील गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या पुरातनकालीन नृसिंह नारायण मंदिराचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने या कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान भाविकांनी व नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील काम शासनाने दिलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे न करता पर्यटन विभागाचे अधिकारी व गुत्तेदार (कंत्राटदार) यांच्या संगनमताने सदर काम निकृष्ट करण्यात आल्यामुळे या कामाची चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१९-०१-२०२१) :**(१) व (२) हे खरे नाही. राहेर ता. नायगांव, जि. नांदेड येथील नृसिंह मंदिर परिसरात नुतनीकरण व सुशोभिकरण या कामासाठी शासन निर्णय, दि.६.०२.२०१८ अन्वये रु.७६.२०लक्ष या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर कामासाठी रु.२०.००लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदरचे काम निविदा प्रक्रिया राबवून कमी दराच्या निविदाधारकास देण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि. नांदेड) आगारातील एस.टी. महामंडळाच्या बसेसची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३१) १२६५४ (१६-०९-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि. नांदेड) आगारातील एस.टी. महामंडळाच्या बसेसची दुरवस्था झाली असून ६१ बसेस पैकी १० पेक्षा अधिक बसेस मोडकळीस आलेल्या व नादुरुस्त असणे तसेच बसेसमध्ये प्रथमोपचार पेटी व अग्निशमन यंत्रणाही कार्यान्वित नसून याकडे विभागीय नियंत्रक यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशी आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुखेड आगारातील बसेसची तात्काळ दुरुस्ती करणे आणि मोडकळीस आलेल्या अवस्थेतील बसेस बंद करून त्या ऐवजी नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रवाशी यांच्याकडून वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात येऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०७-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्य परिवहन मुखेड आगारात चालनात असणाऱ्या बसेसमध्ये अग्निशमन यंत्र व प्रथमोपचार पेटी उपलब्ध आहे.

(२) व (३) सन २०१९-२० मध्ये मुखेड आगारास ६ नवीन वाहने देण्यात आली असून, आयुर्मान पूर्ण झालेली ५ वाहने मोडीत काढण्यात आलेली आहेत. सर्व वाहनांचे वर्षामधील सरासरी आयुर्मान ७.९ वर्ष आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३२) १२७५४ (१४-०९-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात अवैध गुटखा गोडावूनवर कारवाई करुन माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान कोट्यवधी रुपयांचा अवैध गुटखा जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारवाई दरम्यान बेकायदेशीर गुटखा वाहतूक करून विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कंपनीचे डायरेक्टर व मॅनेजर आणि गोडावून मालक, भिवंडी यांच्याविरोधात अन्न व औषध कायद्याअंतर्गत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२१-०१-२०२१) :**(१) हे अंशतः खरे आहे.

भिवंडीमध्ये माहे मे, २०२० मध्ये ४ प्रकरणात एकूण रु.१,०२,००,८९९/- किंमतीचा गुटखा सह इतर प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(२) होय, हे ही अंशतः खरे आहे.

(३) हे ही अंशतः खरे आहे.

भिवंडी येथील एकूण ४ प्रकरणात परत्वे, गोडाऊन चालक/मालक व वाहन चालक तसेच मालक यांच्यावर संबंधित पोलीस स्टेशन येथे गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

(४) संबंधित प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनला भा.द.वि. कलमांतर्गत व अन्न सुरक्षा मानदे कायद्यांतर्गत प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आलेला आहे, या सर्व प्रकरणात तपास चौकशी चालू असून तपास चौकशी पूर्ण झाल्यावर सर्व संबंधितांविरुध्द उचित कार्यवाही घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तारापूर औधोगिक क्षेत्रातील (जि. पालघर) बजाज हेल्थ केअर लि.या कंपनीने घातक रसायन नाल्यात सोडल्याबाबत**

**(३३) १२८९१ (१६-०९-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर औधोगिक क्षेत्रातील बजाज हेल्थ केअर लि.या कंपनीने रात्री उशिरा घातक रसायन नाल्यात सोडल्याचे दि.२५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१८-१२-२०२०) :** (१) याबाबतचे वृत्त दि. २५ मे, २०२० रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.

(२) त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे. बजाज हेल्थ केअर लि. या उद्योगामध्ये करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगास दिनांक ०८/०६/२०२० रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते. तद्नंतर काही अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २४/०६/२०२० रोजी उत्पादन पुन्हा सुरु करण्याचे आदेश दिले होते. तद्नंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ११/०७/२०२० रोजी केलेल्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगास पुन्हा दिनांक १४/०७/२०२० रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळातील रिक्त जागा भरण्याबाबत**

**(३४) १२९६६ (१७-०९-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळात मनुष्यबळाची कमतरता असून मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांच्या आरोग्यावर थेट परिणाम करणाऱ्या प्रदूषण नियंत्रणासाठी विभागात मंजूर असलेल्या जागांपैकी केवळ ७०० कर्मचारी कार्यरत असून या विभागात मागील दहा वर्षापासून टेक्निकल स्टाफ ची नियुक्ती केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर विभागातील रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०८-०१-२०२१) :** (१) व (२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवर एकूण ८३९ पदे मंजूर असून, त्यापैकी सध्या ५४२ पदे भरलेली व २९७ पदे रिक्त आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये सन २०१८ मध्ये तांत्रिक (टेक्निकल) संवर्गातील नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनेगाव (ता. जामखेड, जि.अहमदनगर) व पुणे येथे लॉकडाऊनच्या काळात रेशनिंगच्या धान्यामध्ये काळाबाजार होत झाल्याबाबत**

**(३५) १२९७३ (११-०७-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनेगाव (ता. जामखेड, जि.अहमदनगर) येथील रेशनिंगचा २४ टन तांदूळ काळ्याबाजारात नेताना माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान पकडण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच लॉकडाउनच्या काळात पुणे विभागातील बरेचसे कार्डधारक परगावी गेलेले असतानासुद्धा नागरिकांना शंभर टक्के धान्य वाटप केल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत असून पुणे जिल्हयातील रेशनिंग दुकानदारांनी सुद्धा मोठ्या प्रमाणात रेशनिंगच्या धान्याचा काळाबाजार केल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार काळ्या बाजारात स्वस्त धान्य विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलांबाची कारणे काय आहेत

**श्री. छगन भुजबळ (११-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे. मौजे-सोनेगाव, ता.जामखेड येथील स्वस्तधान्य दुकानदार यांचेविरुध्द जीवनावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

(२) व (३) पुणे शहरात रेशन दुकानदार काळाबाजार करत असल्याबाबतच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तसेच रास्तभाव दुकान विहित वेळेच्या आधीच बंद करणे, दुकानातून नियमानुसार विक्री झालेले आणि प्रत्यक्षात उपलब्ध धान्य यामध्ये तफावत असणे अशा तक्रारी प्राप्त झाल्याने रास्तभाव दुकानाच्या जानेवारी, २०२० ते जुलै, २०२० या कालावधीत तपासण्या करण्यात आल्या. तपासणी अंती ६ रास्तभाव दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले असून १ परवाना निलंबित करण्यात आला आहे. तसेच, २९ प्रकरणांमध्ये अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे व ३ रास्तभाव दुकानांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. १८ प्रकरणांच्या सुनावण्या प्रलंबित असून त्याबाबत अंतिम आदेश पारित करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

सातारा जिल्हयात मौजे खर्शी तर्फे कुडाळ या स्वस्त धान्य दुकानदाराने रेशनिंगचा काळाबाजार केल्याची तक्रार प्राप्त झाल्याने त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला असून त्याचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्धभवत नाही.

---

**उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यात अवैधरित्या प्रवासी वाहतुकीने राज्य परिवहन महामंडळाचे झालेले नुकसान**

**(३६) १३४०१ (१६-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबद व सोलापूर जिल्ह्यात अवैधरित्या सुरु असलेल्या प्रवासी वाहतुकीने राज्य परिवहन महामंडळाला दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त दोन्ही जिल्ह्यातील सर्वच डेपोजवळ अवैध प्रवासी वाहनांचा सर्व्हे सुरु करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या जिल्ह्यातील अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०७-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) राज्य परिवहन उस्मानाबाद व सोलापूर विभागात अवैध प्रवासी वाहतूक मोठया प्रमाणात होत असल्याने सर्व आगारामार्फत सर्व्हे करुन अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची यादी तयार करुन पोलीस अधीक्षक/ सहाय्यक पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, प्रादेशिक परिवहन अधिकारी व संबंधित पोलीस स्टेशन यांना देण्यात आली असून, अवैध प्रवाशी वाहतूक करणा-या वाहनांना प्रतिबंध करणे/कारवाई करण्याबाबत कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात भेसळयुक्त मिठाई व पनीरची विक्री होत असल्याबाबत**

**(३७) १३४३० (१४-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परप्रांतीयांनी मिठाई विक्रीची दुकाने सुरु केली असून त्यामधून विक्री केल्या जाणाऱ्या मिठाईमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ केली जात असल्याचे गत काही दिवसांमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथे विक्री करण्यात येणाऱ्या पनीर मध्ये भेसळ केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करणात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२१-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) अन्न व औषध प्रशासनामार्फत दर वर्षा प्रमाणे या वर्षी सुध्दा सणासुदीच्या कालावधीत (जानेवारी २०२० च्या दरम्याने) पुणे येथे विक्री करण्यात येणाऱ्या पनीरचे ४४ नमुने विश्लेषणासाठी घेतले असता त्यातील ३४ नमुन्यात मिल्क फॅट चे प्रमाण मानकापेक्षा कमी असल्याचे आढळुन आले आहे, त्यात कोणतेही भेसळीचे पदार्थ आढळुन आले नाहीत. मानदाप्रमाणे नसलेल्या ३४ नमुन्याप्रकरणी तपास व चौकशी करून न्यायनिर्णयाकरीता दाखल करण्यात आली आहेत व ते न्यायनिर्णयासाठी प्रलंबित आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावेर वाणी पाडा (जि.ठाणे) येथील धान्य काळया बाजारात विक्री करण्याकरिता नेत असताना केलेल्या कारवाईबाबत**

**(३८) १३४५० (१५-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात टाळेबंदी घोषित केलेली असताना गरीब जनतेला आवश्यक प्रमाणात रास्त दरात धान्य उपलब्ध करून देणे गरजेचे असताना सावेर वाणी पाडा (जि.ठाणे) येथील शासनमान्य शिधावाटप रास्त धान्य दुकानातून तांदळाच्या १० गोणी खाजगी टेंम्पोमध्ये भरून काळया बाजारात विक्री करण्यासाठी नेत असताना स्थानिक नागरिकांनी माहे जून-जुलै, २०२० मध्ये वा त्या दरम्यान पकडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने या प्रकरणी दोषी दुकानदार व वाहतुकदार यांचेवर कारवाईस विलंब करणाऱ्या बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करणात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (११-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने रास्त धान्य दुकानाच्या तपासणीअंती ४० किलो तांदळाची तफावत आढळून आली आहे. सुनावणीअंती रास्त भाव धान्य दुकान सावरे, ता. जि. पालघर येथून जिवदानी महिला बचत गट यांना जोडला असलेला परवाना निलंबित करण्यात आला असून १००% अनामत रक्कम शासन जमा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या वतीने धान खरेदी करणाऱ्या राईस मिलर्सना धानाची उचल व ठेव करताना सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सक्ती करणेबाबत**

**(३९) १३४६९ (१५-०९-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून खरेदी केलेल्या धान्यापैकी हजारो टन धान दरवर्षी पावसाच्या पाण्यात भिजून खराब होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या राईस मिलर्सना धान उचलण्याची जबाबदारी दिली जाते ते राईस मिलर्स महामंडळच्या केंद्रावरील धान उचलुन आपल्या स्व मालकीच्या राईस मिल मध्ये न नेता परस्पर इतर लोकांना धान विक्री करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी धानाची उचल व ठेव करताना सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सक्ती केल्यास धानाची होणारी नासाडी थांबून धान शासनाने मंजूर केलेल्या ठिकाणी व योग्य वेळी पोहचणे शक्य होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे प्रतिवर्षी शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असूनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन विशिष्ट लोकांना लाभ मिळवून देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार यात दोषी अधिकारी व राईस मिलर्सवर कारवाई करणे तसेच धानाची उचल व ठेव करताना सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१७-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
आदिवासी विकास महामंडळाकडून प्राप्त माहितीनुसार आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत आदिवासी विकास महामंडळामार्फत दुर्गम व अतिदुर्गम भागात गोदाम पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने खरेदी करण्यात आलेल्या धानापैकी पावसाळ्यापूर्वी १००% धानाची भरडाई न झाल्यास पावसामुळे व अवकाळी पावसाने धान भिजण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्र स्टेट को- ऑप. मार्केटिंग फेडरेशन, मुंबई यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कोणत्याही प्रकारचे धान भिजून खराब झाले नाही.

(२) असे निदर्शनास आलेले नाही.

(३) राईस मिलर्सनी त्यांच्या मिलमध्ये सीसीटीव्ही लावावेत अशी तरतूद शासन परिपत्रक दि.८.११.२०२० मध्ये करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ८ समुद्रकिनारी बीच शॅक्स उभारणीबाबत

**(४०) १३५५७ (१६-०९-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटन वृध्दीसाठी राज्याच्या किनारपट्टीवरील ८ किनाऱ्यांवर पायलट प्रोजेक्ट म्हणून “बीच शॅक्स” (चौपाटी कुटी) उभारण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक २५ जून, २०२० रोजीच्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शॅक्स परवान्यासाठी रु. १५०००, भाड्याची रक्कम रु. ४५ ते ५५ हजार व सुरक्षा अनामत रु. ३० हजार या रकमा पाहता बाहेरील श्रीमंत व्यक्ती यामध्ये भाग घेणार असल्याची तसेच भरती रेषा व स्थानिकांच्या मालकी हक्कांच्या जमीनीमध्ये असणारी "सरकारी शेरे" जमीन कवडीमोल किंमतीत मोठ्या उद्योजकांना दिली जाण्याची भीती स्थानिकांमध्ये निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर "सरकारी शेरे" जमिनीचा उपयोग मच्छीमारांकडून पारंपारिक रापणीच्या होड्या, जाळी - बोटी ठेवणे, जाळी विणणे, मासे खारवणे, मासे सुकविणे या कामांसाठी केला जात असल्याने त्यांनाही त्यांच्या व्यवसायात या शॅक्सचा अडथळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील पंधरा ते वीस वर्षांपासून जे स्थानिक पर्यटन व्यावसायिक "होम स्टे" च्या माध्यमातून पर्यटकांना निवास तसेच किनारपट्टीतील खाद्यसंस्कृतीचा आस्वाद देणारे भोजन या सुविधा पुरवित आहेत त्यांच्याही मनात या शॅक्समुळे त्यांच्या या घरगुती व्यवसायावर मोठा प्रतिकूल परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त कारणांबरोबरच गोव्यातील किनाऱ्यांसारखे व्यावसायिक स्वरूप या शॅक्समुळे कोकणातील किनाऱ्यांना येणार असल्याचे तसेच मद्य, संगीत व नृत्य यामुळे शांतताभंग होऊन किनाऱ्यांचे जुने वैभव लयाला जाणार असल्याच्या भीतीमुळे स्थानिक व मच्छीमारांचा या प्रकल्पाला तीव्र विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, स्थानिक जनता, मच्छीमार व पर्यटन व्यावसायिक यांच्या मनातील उपरोक्त भीती / शंका दूर करण्याच्या दृष्टीने शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे ?

**श्री. आदित्य ठाकरे (१९-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शॅक्सकरीता वापरण्यात येणारी जमिनीचे मालकी हस्तांतरण करण्यात येणार नसून सदर जमिनीचे संगणकिय पध्दतीने तीन वर्षाकरीता भाडे पट्ट्याचे वाटप करण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही मासेमारीसाठीच्या / वापराच्या जागा या धोरणाअंतर्गत वगळण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) तक्रारदारांच्या निवेदनाच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

---

## शासकीय धान्य खरेदी केंद्रात विक्री केलेल्या धानाच्या बोनसची रक्कम मिळण्याबाबत

**(४१) १३८८८ (१५-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय धान्य खरेदी केंद्रात विक्री केलेल्या धानाच्या बोनसची रक्कम मिळण्याबाबत बल्लारपूर येथील लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे दिनांक ९ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२८-१२-२०२०)** :(१) सदर विषयी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या कार्यालयाकडे कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही.
(२) मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळ या अभिकर्तासंस्थामार्फत चंद्रपूर जिल्ह्यात खरीप पणन हंगाम २०१९-२० करीता शासनाने मंजूर केलेल्या प्रोत्साहन राशीची (बोनस) २६७३७ शेतकऱ्यांना एकूण रु.५६,७३,४६,७९७/- इतकी रक्कम ऑनलाईन प्रक्रियेद्वारे संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायावर परिणाम झाल्याबाबत

**(४२) १४००३ (१६-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यात माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आलेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे पर्यटन व्यवसायावर मोठ्याप्रमाणात परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायिकांना कोणत्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत तसेच त्यांच्या कर्जमाफीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच कर्जमाफीच्या अंमलबजावणीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१९-०१-२०२१)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) पर्यटन व्यवसायांना सुविधा व मदत होण्याच्या अनुषंगाने राज्यातील हॉटेल्स, रिसॉर्टस्, होम-स्टे, निवास व न्याहरी सुरु करण्यासाठी दि.८.९.२०२० रोजी तर उपाहारगृहे सुरु करण्यासाठी दि.०३.१०.२०२० रोजी मानक कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आली आहे. राज्यांतर्गत टुर्स सुरु करण्यासाठी दि.०७.१०.२०२० रोजी टुर ऑपरेटर्सकरिता मानक कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आली आहे.

राज्यात आदरातिथ्य उद्योग सुरु करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्याकरिता पर्यटन विभाग, शासन निर्णय, दि.०२.११.२०२० अन्वये यापुढे फक्त १० परवानग्या / परवाने / ना-हरकत प्रमाणपत्रे आणि ९ स्वयं प्रमाणपत्रे आवश्यक करण्यात आली आहेत.

तसेच केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून दि.०१.०४.२०२१ पासून, वीज दर, वीज शुल्क, पाणी पट्टी, मालमत्ता कर, विकास कर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील समुद्रकिनाऱ्यांस भेट देणाऱ्या पर्यटकांना विश्रांती, आहार तसेच सार्वजनिक प्रसाधनगृहे, स्नानगृहे इ. सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पर्यटन विभाग, शासन निर्णय, दि.१७.०८.२०२० अन्वये राज्याचे, 'बीच शॅक्स धोरण' जाहिर करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय, दि.२८.०९.२०२० अन्वये राज्याचे 'कृषी पर्यटन, धोरण जाहिर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील रब्बी हंगामातील धान्याची खरेदी सुरू करण्याबाबत**

**(४३) १४०४१ (१५-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील रब्बी हंगामातील धान्य खरेदी सुरू करण्याबाबत बल्लारपूर येथील लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक ४ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२८-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील रब्बी हंगामातील धान खरेदीकरण्याकरिता चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्यातील ब्रम्हपुरी येथे २ व बरडकिन्ही येथे १ अशी तीन खरेदी केंद्रावर धान खरेदी करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यात अवैध गुटखा विक्री होत असल्याबाबत**

**(४४) १४३४९ (१४-०९-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२० ते जुलै, २०२० या दरम्यान अन्न व औषध प्रशासन विभागाने २७ प्रतिबंधक कारवाई करून ३१ लाख २५ हजार रूपये किंमतीचा अवैध गुटखा जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे संचार बंदी तसेच पान मसाल्याची दुकाने बंद असतांना अवैध गुटखा साठा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुटखा माफीयांना प्रतिबंध करण्यास स्थानिक अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०५-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
अकोला जिल्ह्यात माहे एप्रिल २०२० ते जुलै २०२० या कालावधीत एकुण २८ प्रकरणी एकत्रित किंमत रु. ३१,३१,८६९/- चा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा जसे गुटखा, पानमसाला,सुगंधित तंबाखू यांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे व या सर्व २८ प्रकरणी एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत.
माहे एप्रिल २०२० ते आजतागायत प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या जसे गुटखा,पानमसाला,सुगंधित तंबाखु यांच्या एकूण २९ प्रकरणांमध्ये एकत्रित किंमत रु. १,२४,९१,८६९/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आलेला आहे व सर्व २९ प्रकरणी एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) होय.
माहे एप्रिल २०२० ते आजतागायत प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या जसे गुटखा,पानमसाला,सुगंधित तंबाखु यांच्या २९ प्रकरणांमध्ये एकत्रित किंमत रुपये १,२४,९१,८६९/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आलेला आहे व सर्व २९ प्रकरणी एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत.
सन २०१९-२०२० मध्ये या कालावधीत एकूण १८५ पेढयांच्या तपासण्या करण्यात आल्या असून, ५३ प्रकरणी किंमत रु.१,६६,१९,९९४/- चा गुटखा,पानमसाला,सुगंधित तंबाखु या प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आलेला असून ४१ प्रकरणी एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत व ७९ प्रकरणी खटले दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी शहर (जि. ठाणे) परिसरात २० हजारापेक्षा जास्त बोगस रिक्षा चालक असल्याबाबत**

**(४५) १४७१० (०२-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहर परिसरात (जि.ठाणे) केवळ ८ हजार अधिकृत रिक्षा चालक असून सुमारे २० हजाराहून अधिक बोगस प्रवासी रिक्षा चालक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील हे रिक्षा चालक मनमानीपणे करत असून मीटर पद्धतीने रिक्षा भाडे न आकारता त्यांच्या मर्जीनुसार प्रवाश्यांकडून शेअर भाडे आकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू बोगस रिक्षा चालकांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१४-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, ठाणे या कार्यालयामार्फत भिवंडी शहर परिसरासाठी २१,०८० इतके ऑटोरिक्षा परवाने जारी करण्यात आलेले आहे. रिक्षा परवाना मिळविण्यासाठी उमेदवाराकडे अनुज्ञप्ती व सार्वजनिक वाहन सेवा बिल्ला असणे आवश्यक आहे.

(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे या कार्यालयास सन २०१९ ते सन २०२० मध्ये २ तक्रारी प्राप्त झालेल्या असून उक्त तक्रारीनुसार अनुज्ञप्ती व परवाना निलंबित करण्यात आलेला आहे. सदर कारवाईतून रू.२०००/- इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आलेले आहे.

तसेच सन २०१९ ते सन २०२० या कालावधीत भिवंडी शहर वाहतूक (पोलिस) शाखेव्दारे केलेल्या कारवाईत अनुज्ञप्ती व बिल्ला नसलेल्या ३४९ प्रकरणात रु.१,२२,९००/- एवढा दंड वसूल केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ई-सिगारेट व हुक्का यावर बंदी आणण्याबाबत.

**(४६) १४८३९ (१४-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ई-सिगारेटच्या वापरामुळे तरुणपिढीचे जीवन धोक्यात आले असून ई-सिगारेट व हुक्का यावर बंदी आणून त्यावर कारवाई करण्याचे आदेश राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासनाने दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाही मुंबईसह अनेक भागांत छुप्या पद्धतीने ई-सिगारेट आणि हुक्का पार्लरचा व्यवसाय केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ई-सिगारेट व हुक्का पार्लरवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२१-०१-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.

निकोटीनयुक्त ई-सिगारेटच्या वापरामुळे तरूण पिढीत व्यसन जडण्याची शक्यता आहे. ही बाब विचारात घेवून राज्याचे अन्न व औषध प्रशासनाने दि. ०५.०३.२०१९ च्या पत्रान्वये औषध नियंत्रक (भारत सरकार) नवी दिल्ली यांनी मान्यता न दिलेल्या ENDS व तत्सम पाठाचे उत्पादन, विक्री वितरणा संदर्भात कारवाई करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुषंगे राज्याचे अन्न व औषध प्रशासनाने दि. ०५.०३.२०१९ च्या पत्रान्वये राज्यातील अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

(३) अन्न व औषध प्रशासनाच्या वरील निर्देशानुसार बृहन्मुंबई विभागातील औषध निरीक्षकांनी माहे जुन-२०१९ च्या दरम्यान ई-सिगारेटचा साठा बांद्रा, मुंबई येथे एका ठिकाणी जप्ती व

अंधेरी व सांताक्रुझ या दोन ठिकाणी साठा प्रतिबंधची कारवाई केली आहे. त्याबाबत संबंधितांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे याचिका दाखल केल्या. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय यांनी दि.०२.०८.२०१९ रोजी अंतरीम निकाल दिला. त्यानुसार मा. उच्च न्यायालयाने, औषध निरीक्षक यांनी जप्त व प्रतिबंधित केलेला ई-सिगारेटचा साठा मुक्त करण्याचे निर्देश दिले तसेच अशा प्रकारची कारवाई न घेण्याचे निर्देश दिले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली इतर औषधांची विक्री होत असल्याबाबत**

**(४७) १४८४६ (१७-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक व्याधी, त्वचाविकार व इतर आजारावरील उपचारांसाठी सर्वसामान्य नागरीकांकडून आयुर्वेदिक औषधांचा वापर वाढत असून अनेक कंपन्या आयुर्वेदिक औषधांच्या नावावर इतर औषधांची विक्री करत असल्याने आता आयुर्वेदिक औषधांच्या विक्रीसाठी अन्न व औषध प्रशासनाचा परवाना घ्यावा लागणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार किती आयुर्वेदिक औषध कंपन्यांनी विक्री परवाने घेतले आहेत तसेच अद्यापपर्यंत परवान न घेता औषध विक्री करणा-यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०५-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
अशा प्रकारची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही. औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यात आयुर्वेदीक औषधे विक्रीसाठी विक्री परवाना देण्याची तरतुद नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कोरोना महामारीमुळे शाळा व्यवस्थापनाने शुल्क वाढ न करण्याबाबत**

**(४८) १५४८२ (२०-११-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी):** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनामुळे शाळा व्यवस्थापनाने शुल्क वाढ करु नये तसेच सन २०१९-२० या काळातील थकीत शुल्क एक रक्कमी न घेता टप्प्या टप्प्याने घेण्यात यावे असा निर्णय घेऊन याबाबत शासनाने दि.०८ मे, २०२० रोजी अध्यादेश काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असोसीएशन ऑफ इंडियन स्कूल, ग्लोबल एज्युकेशन फॉउंडेशन, ज्ञानेश्वर माऊली संस्था आणि नवी मुंबईतील कासेगाव एज्युकेशन ट्रस्टने या अध्यादेशाला विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर शाळा बंद असतांनाही परस्पर शुल्कवाढ करुन शैक्षणिक शुल्क वसुलीसाठी नाशिक शहरासह राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून पालकांवर दबाव टाकण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० वा त्या सुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळा बंद असताना विद्यार्थ्यांकडून संपूर्ण शैक्षणिक शुल्क व वाहन शुल्क घेणाऱ्या नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या शिक्षण संस्थांवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दिनांक ०८ मे, २०२० रोजीच्या अध्यादेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-१२-२०२०) :** (१) या बाबत दिनांक ८/५/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

(२) (३) (४) व (५) याबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून मा. उच्च न्यायालयाने दिनांक २६/६/२०२० रोजी दिनांक ८ मे २०२० रोजीच्या शासन निर्णयास अंतरीम स्थगिती दिली असून सदय:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

### मौजे रामलिंग (ता. शिरुर,जि.पुणे) येथील कंपनी कडून होणाऱ्या प्रदुषणाबाबत.

**(४९) १६२०५ (२४-११-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील रांजणगाव गणपती औद्योगिक वसाहती मधील मेसर्स एव्हरी डेनीसन या कंपनीच्या केमिकल युक्त घातक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे काम हे शिरुर शहराजवळील मौजे रामलिंग (देवस्थान) येथील मेसर्स क्लासिक एंटरप्रायइजेस या कंपनीमार्फत केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केमिकल युक्त घातक कचरा जाळून जमिनीमध्ये पुरुन तसेच जवळच्या जलस्त्रोतामध्ये सोडून विल्हेवाट लावण्याचा प्रकार गत २ वर्षापासून सुरु असून याबाबत ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने संबंधित कंपनी तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या नरजेस आणून देखील संबंधितांवर अद्याप कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ पुणे येथील प्रादेशिक अधिकारी या कंपनीवर कारवाई करण्यास विलंब लावत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात आल्या आहेत, ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१४-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे,
मे. एव्हरी डेनीसन इंडीया प्रा.लि. प्लॉट नं.जी.५, एमआयडीसी रांजणगांव,ता.शिरुर,जिल्हा-पुणे या कंपनीमध्ये वापरण्यात येणाऱ्या कच्यामालाचे रिकामे ड्रम रिकंडीशन करण्याकरिता पाठविले जातात. अन्य कोणत्याही प्रकारचा घातक घनकचरा येथे पाठविला जात नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयात भूजल पुनर्भरण रिचार्ज शाफ्टची कामे करण्यासाठी मंजूर केलेल्या निधीत झालेला गैरव्यवहार

**(५०) १९४३० (२१-११-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात भूजल पुनर्भरण रिचार्ज शाफ्टची कामे करण्यासाठी सन २०१९-२० मध्ये २ कोटी ३८ लाख ६६ हजार ७५२ रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाची एकच निविदा न काढता वेग-वेगळ्या निविदा काढून गैरव्यवहार करण्यात आला असल्याने याबाबत उपसंचालक, औरंगाबाद भूजल सर्वेक्षण यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे, संयुक्त सामाजिक दायित्व निधी (CSR) अंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातील भूजल पुनर्भरण रिचार्ज शाफ्ट कामा करिता जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण अणि विकास यंत्रणा उस्मानाबाद व समूह महा प्रबंधक, ओएनजीसी मुंबई यांमध्ये त्रिस्तरीय करारनामा करण्यात आला आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी एकूण रु. २ कोटी ३८ लाख ६६ हजार ७५२ रुपये रकमेच्या कामांची निविदा काढण्यात आली आहे. या निविदा प्रक्रियेबाबत व कामासंदर्भात उपसंचालक, औरंगाबाद भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(३) अद्याप चौकशी सुरु आहे.
(४) कोविड-१९ विषाणू प्रार्दूभावाच्या परिस्थितीमुळे चौकशी करण्याची मुदत दि.१०.०१.२०२१ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.